न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयांतर्गत रत्नागिरी (रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयांकरीता) जिल्हयाच्या ठिकाणी नवीन लघु न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा <u>स्थापन करणेबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र.एफएसएल-०४१७/प्र.क्र.३० (१) /पोल-४,
मंत्रालय,मुंबई - ४०००३२,
दिनांक:-२४ जानेवारी, २०१८

<u>वाचा</u> :- १) गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक: एफएसएल-०५१०/प्र.क्र.६८५/पु.बा. क्र.६३/ पोल-४, दि.१५.१२.२०१४

२) प्रभारी संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.मुं.का ६४९१-९२/१६, दि.१५.१०.२०१६

३) प्रभारी संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.मुं/का/ २९९१-९२/१७, दि.०३.०५.२०१७

<u>प्रस्तावना</u>:-

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयातंर्गत विविध प्रयोगशाळांमार्फत समाजात घडणाऱ्या निरनिराळया गुन्हयांमधील जप्त नमुन्यांचे शास्त्रीय पध्दतीने विश्लेषण करुन त्याबाबतचा अहवाल विहित कालावधीत तपासी यंत्रणांना उपलब्ध करुन देणे व तद्नंतर सदर अहवाल मा. न्यायालयात वैज्ञानिक पुरावा म्हणून सादर करण्यामध्ये सदर प्रयोगशाळांची महत्वाची भूमीका आहे. फौजदारी खटल्यातील सिध्दापराध प्रमाण वाढविण्याकरीता उपाययोजना करण्यासाठीही राज्यातील न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांचे सक्षमीकरण करण्याबाबत प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि.१२.५.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या समितीने शासनास अहवाल सादर केला असून, सदर अहवालातील शिफारशी या मा.मुख्यमंत्री महोदयांनी स्विकारल्या आहेत. त्यामध्ये ५ नविन प्रयोगशाळा निर्माण करणे व अद्ययावत यंत्रसामुग्री व साधनसामुग्री उपलब्ध करुन देण्याबाबतच्या शिफारशींचा समावेश आहे.

राज्यात न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या अधिपत्याखालील मुंबई येथे मुख्यालय असून नागपूर, पुणे, औरंगाबाद, नाशिक व अमरावती, नांदेंड व कोल्हापूर येथे एकूण ८ प्रादेशिक न्यायसहायक प्रयोगशाळा कार्यरत आहेत. सामाजिक हिताच्या दृष्टीकोनातून तपासी यंत्रणांना आणि पर्यायाने न्यायदान यंत्रणेला वैज्ञानिक पुरावा वेळेवर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने अस्तित्वात असलेल्या प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांवरील प्रलंबित प्रकरणांचा भार कमी करून प्रकरणे प्राथम्याने निकाली काढली जावीत व फौजदारी खटल्यातील सिध्दपराध प्रमाण वाढविण्यासाठी

जीवशास्त्र व विषशास्त्र हे दोन विभाग समाविष्ट असलेली रत्नागिरी (रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयांकरीता) जिल्हयाच्या ठिकाणी लघु न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

१. राज्यामधील न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या अधिपत्याखाली प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांवरील प्रलंबित प्रकरणांचा भार कमी करून प्रकरणे प्राथम्याने निकाली काढण्यासाठी रत्नागिरी (रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयांकरीता) जिल्हयाच्या ठिकाणी लघु न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर लघु न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेमध्ये जीवशास्त्र विभाग आणि विषशास्त्र विभाग सुरु करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर लघु प्रयोगशाळेसाठी कायमस्वरूपी जागा मिळेपर्यंत तात्पुरती व्यवस्था म्हणून रु.२.०० लक्ष रकमेमध्ये भाडेतत्वावर जागा उपलब्ध करून घेण्यात येईल. तदनंतर शासनाच्या विविध विभागाकडून शासकीय जागा उपलब्ध झाल्यास या प्रयोगशाळेसाठी इमारत बांधकामाबाबतचा प्रस्ताव स्वतंत्ररित्या सादर करण्यात येईल.

४. रत्नागिरी जिल्हयाच्या ठिकाणी लघु न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेसाठी खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे आवर्ती व अनावर्ती खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे.

<u>नवीन लघु न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेसाठीचा अनावर्ती व आवर्ती खर्च</u>

अ.क्र.	बाब	एकूण (रूपये लाखात)
	अनावर्ती खर्च	
१	प्रयोगशाळेसाठी आवश्यक फर्निचर, इ. खर्च	२५.००
२	ग्रंथालय (पुस्तके, शास्त्रीय नियतकालिके यांचा खर्च)	५.००
३	इंटरकॉम, दूरध्वनी (नवीन), फॅक्स इ.	५.००
३	प्रयोगशाळेसाठी आवश्यक वाहनांचा खर्च	७.५०
४	नवीन प्रयोगशाळेसाठी लागणारी यंत्रे, उपकरणे	९०.००
	एकूण अनावर्ती खर्च (अ)	**१३२.५०**
	आवर्ती खर्च	
१	प्रयोगशाळेसाठी कायमस्वरूपी व्यवस्था होईपर्यंत तात्पुरती जागा भाडे खर्च अंदाजे प्रति माह रु.२.०० लक्ष याप्रमाणे एका वर्षाकरीता	२४.००
२	कार्यालयीन खर्च (वीज, पाणी, भाडे, कर, दूरध्वनी खर्च, पेट्रोल इ.)	५.००
	एकूण आवर्ती खर्च (ब)	**२९.००**
	एकत्रित एकूण खर्च (अ+ब)	**१६१.५०** **(सुमारे रु. १.६२ कोटी)**

३. न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाअंतर्गत राज्यामध्ये सध्या कार्यरत असलेलया ८ प्रादेशिक प्रयोगशाळांसाठी आवश्यक असलेली यंत्रसामुग्री/साधनसामुग्री इत्यादी संचालनालयाच्या स्तरावर केंद्रिय पध्दतीने खरेदी प्रक्रिया करुन उपलब्ध करुन दिली जाते. त्याचपध्दतीने सदर

प्रयोगशाळेसाठी सुध्दा लागणारी यंत्रसामुग्री व उपकरणे आणि काच सामान व रसायने ही साधनसामुग्री संचालनालयाच्या स्तरावर केंद्रिय पध्दतीने खरेदी करुन उपलब्ध करुन देण्यात येईल.

४. सदरचा खर्च गृह विभाग “मागणी क्र. बी-१ २०५५, पोलीस (००) ११६ न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा (००) (०३) न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा (कार्यक्रमावरील खर्च) (२०५५ ०५२४) ५२- यंत्रसामुग्री व साधनसामुग्री” आणि “मागणी क्र. बी-१ २०५५, पोलीस (००) ११६ न्यायसहायक विज्ञान (००) (०१) न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा (२०५५ ०३१९) (अनिवार्य) १३-कार्यालयीन खर्च या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दि.१७.०४.२०१५ आणि वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग-पहिला, उप विभाग -तीन मधील अ.क्र.४,नियम क्र.२७ (२) अन्वये प्रशासनिक विभागास असलेल्या पुर्ण प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२४१२०९२३३३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Somnath V Potare

Digitally signed by Somnath V Potare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4d677dcd1bc3bed55a48ddbdaad925a6651c5d43a12d84cf305d3ff791ea7f16, cn=Somnath V Potare
Date: 2018.01.24 12:13:09 +05'30'

(सोमनाथ पोटरे)
अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री,गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.राज्यमंत्री,गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
६. महासंचालक(न्यायिक व तांत्रिक), महाराष्ट्र राज्य,मुंबई
७. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
८. संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९. उप संचालक,प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, नागपूर, पुणे, औरंगाबाद,
१०.नाशिक व अमरावती, नांदेंड व कोल्हापूर
११. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर

१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१३. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१४. सह सचिव (पोल-४), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-१३) मंत्रालय, मुंबई
१६. वित्त विभाग (व्यय-७/सेवा-६) मंत्रालय, मुंबई-४०००३२
१७. निवडनस्ती/गृह विभाग (पोल-४)